# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३५/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. सदानंद नरसू गावडे,<br>रा. नांदवडे, ता. चंदगड,<br>जि. कोल्हापूर. | अपेलंट |
| **<u>विरूध्द</u>** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>मंडळ कार्यालय, ताराबाई पार्क,<br><u>कोल्हापूर.</u><br><br>२) कार्यकारी अभियंता(संवसु)<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>विभागीय कार्यालय गडहिंग्लज,<br>जिल्हा–कोल्हापूर.<br><br>३) सहाय्यक अभियंता (संवसु),<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>उपविभाग चंदगड,<br>जिल्हा–कोल्हापूर.<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव

## <u>महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. सदानंद नरसू गावडे, रा. नांदवडे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर यांनी शेती पंपाचे वीज पुरवठयाबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडळ कार्यालय, कोल्हापूर येथे विहीत नमुन्यांत तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. १८–७–२००७ रोजी दिलेला निर्णय मान्य न झाल्याने त्यांनी प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरूप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते –

श्री. गावडे यांच्या शेती पंपास सन १९९८ पासून शेवाळे ग्रुप रोहित्रामधून व्यवस्थित विद्युत पुरवठा होत नसल्याने त्यांनी वाढीव पांच मोटार धारकांचा ग्रुप करून नवीन रोहित्राची मागणी केली होती. त्यास अनुसरून वि.प.ने सन २००६ मध्ये नवीन रोहित्राची उभारणी केली. नवीन राहित्राचे उभारणीचेवेळी कांही पोल टाकल्यानंतर त्यास श्री. धोंडिबा नारायण पाटील यांनी हरकत घेतली व लाईन ओढू दिली नाही. त्यामुळे सदरचे काम २/३ वर्षे रेंगाळले. त्यानंतर ग्राहकाचे शेतात पोल टाकून व सर्किट वळवून वीज पुरवठा चालू केला. श्री. धोंडिबा पाटील यांनी लाईन टाकतांना विरोध केल्याचे वेळी श्री. गजानन गुंडकल, कनिष्ठ अभियंता, चंदगड यांनी त्यास कसलीही विचारणा केली नाही अगर अनावश्यक हरकत घेतल्याचेकामी त्यांच्या विरूध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. मात्र ग्राहकाने मंजूर करून घेतलेल्या नवीन रोहित्रावरून वि.प. यांनी श्री. धोंडिबा पाटील यांना त्वरेने वीज कनेक्शन दिले आहे. सदरचे वीज कनेक्शन जोडून देतांना वि.प. यांचेवतीने कोणीही हजर नव्हते. कनिष्ठ अभियंता, चंदगड यांनी ग्राहकाने केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून हरकतदार श्री. धोंडिबा पाटील यांना वीज कनेक्शन दिले आहे. त्याबाबत श्री. गुंड कल, कनिष्ठ अभियंता चंदगड हे सर्वस्वी जबाबदार असल्याने त्यांचे विरूध्द चौकशी करण्यांत येऊन त्यांना कडक शिक्षा द्यावी अशी अपीलदाराची प्रमुख तक्रार आहे. श्री. गावडे यांच्या तक्रारीची दुसरी बाब म्हणजे त्यांना १९९८ ते २००६ या मुदतीत कमी दाबाचा वीज पुरवठा झाल्यामुळे त्यांच्या शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे व आता नवीन रोहित्रावरून व्यवस्थित वीज पुरवठा मिळत असतांना वि.प. यांनी या रोहित्रावरून श्री. धोंडिबा पाटील यांना व त्यानंतर इतरांनाही मागणी प्रमाणे कनेक्शन देण्याचा सपाटा लावला आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा कमी दाबाचा वीज पुरवठा मिळून सन १९९८ ते २००६ चे कालावधी प्रमाणे त्यांच्या शेतीचे पुन्हा नुकसान होणाार आहे . तसे होवू नये अशी त्यांची विनंती आहे.

प्रकरणी सुनावणीची तारीख २७ सप्टेंबर २००७ रोजी विभागीय कार्यालय गडहिंग्लज येथे नेमली होती. सदरचे वेळी श्री. सदानंद गावडे स्वत: उपस्थित होते. वि.प. यांचे वतीने श्री. पी.व्ही. कांबळे, कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर, मंडल कार्यालय, कोल्हापूर, श्री. आवळीकर, उपकार्यकारी अभियंता, उपविभाग गडहिंग्लज, श्री. चिटगी, प्रभारी सहाय्यक अभियंता व श्री. गुंडकल, कनिष्ठ अभियंता, चंदगड हे उपस्थित होते. श्री.बुर्गे, कार्यकारी अभियंता, विभाग गडहिंग्लज हे कार्यालयात असतांना सुनावणीचे वेळी उपस्थित राहिले नाहीत. त्यांची अनुपस्थिती मंचास तीव्रतेने जाणवली. श्री. गावडे यांनी सुनावणीचेवेळी असे सांगितले की त्यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून वीज कनेक्शन देण्याच्याकामी अडथळा करणा–या श्री. धोंडिबा पाटील यास कनिष्ठ अभियंता चंदगड यांनी तत्परतेने वीज पुरवठा केला आहे. त्यामध्ये बरेच मोठे अर्थकारण घडले आहे. त्याची चौकशी करण्यांत येऊन संबंधितास कडक शासन करावे. श्री. गावडे यांच्या म्हणण्या प्रमाणे त्यांना सन १९९८ पासून शेवाळे ग्रुपचे रोहित्रावरून कमी दाबाचा वीज पुरवठा मिळत राहिल्याने त्यांनी जादा ५ वीज मोटार धारकांचा ग्रुप करून नवीन रोहित्र उभारणीची मागणी केली. त्यास वि.प.ने मंजुरी देऊन प्रत्यक्ष पोल टाकण्यास सुरूवात केली. त्यावेळी श्री. धोंडिबा पाटील यांनी हरकत घेतल्याने पोल उभारून लाईन टाकण्याचे काम २/३ वर्षे रेंगाळले. त्याबाबत कनिष्ठ अभियंता चंदगड यांनी श्री. धोंडिबा पाटील यांना कोणताही जाब विचारला नाही. अगर त्याचा अडथळा दूर करण्यासाठी कसलाही प्रयत्न केला नाही. परिणामी उभारणी केलेले अर्धवट पोल तसेच ठेऊन वि.प. ला सर्किट वळवून लाईन टाकावी लागली. असे असतानाही त्यांचेसाठी उभारणी केलेल्या नवीन रोहित्रावरून इसम मजकूर यांचे शेती पंपास तत्परतेने वीज कनेक्शन देण्यात आले आहे. हा ग्राहकावर अन्याय आहे. श्री. गावडे यांनी शेवटी असे सांगितले की कनिष्ठ अभियंता चंदगड यांच्या मनमानी कारभारानुसार श्री. धोंडिबा पाटील यांना तसेच इतरांना मोठया प्रमाणांत वीज कनेक्शन दिल्यास नवीन रोहित्र मंजूर करून घेऊनही त्यांना सन १९९८ ते २००६ चे कालावधीत पूर्वीच्या रोहित्रा प्रमाणें कमी दाबाचा वीज पुरवठा मिळाल्यास त्यांच्या शेतीचे अतोनात नुकसान होणार आहे. तसे ते होऊ नये अशी त्यांनी विनंती केली. नवीन रोहित्रावरील वीज पुरवठयाच्या सद्य:स्थितीबाबत मंचाने श्री. गावडे यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की सध्या तरी आम्हास व्यवस्थित वीज पुरवठा करण्यांत येत आहे. त्याबद्‌दल आमची कसलीही तक्रार नाही. तथापि खबरदारीचा उपाय म्हणून यापुढे आमचे नवीन रोहित्रावरून कोणालाही वीज कनेक्शन देऊ नये अशी त्यांनी विनंती केली.

वि.प. चे वतीने श्री. आवळीकर, उपकार्यकारी अभियंता तसेच श्री. चिटगी, प्रभारी सहाय्यक अभियंता यांनी असे सांगितले की ग्राहकाने त्यांचे ग्रुपचे शेती पंपास कमी दाबाचा वीज पुरवठा होत असल्याने त्यांनी नवीन रोहित्राची मागणी केली होती. ती मंजूर करण्यांत येऊन पोल उभारणीचे कामास सुरूवात करण्यांत आली. त्यावेळी पोल उभारून लाईन टाकण्यास श्री. धोंडिबा पाटील यांनी हरकत घेतली. त्यामुळे सदरचे काम २/३ वर्षे रेंगाळले ही वस्तुस्थिती वि.प. यांना मान्य आहे. त्यामुळे सर्किट वळवून नवीन पोल टाकावे लागले. परिणामी नवीन रोहित्र उभारून कार्यान्वित करण्यास सन २००६ उजाडले. या नवीन रोहित्रावर लोड शिल्लक असल्याने श्री.

धोंडिबा पाटील यांच्या शेती पंपास वीज कनेक्शन दिले आहे. इसम मजकूर यांनी पोल उभारण्यास तसेच लाईन टाकण्यास अडथळा केल्याबाबत त्यांचेकडे विचारणा केली अगर कसे ?



याबाबत मंचाने विचारणा केली असतां वि.प. यांना समाधानकारक खुलासा करतां आला नाही. श्री. चिटगी, प्रभारी सहाय्यक अभियंता यांनी पुढे असे सांगितले की प्रस्तावीत कनेक्शन्स विचारांत घेऊन वितरण मेन्सचा विस्तार /वाढ (Augmentation of distribution main) करण्यात येत आहे. त्यामुळे पूर्वीचे वीज कनेक्शन धारकांना कमी विद्युत दाबाचा (Low Voltage) प्रश्न उद्‌भवणार नाही. सद्या दोन्ही सर्किटवर ५०.५ एवढाच लोड असल्याने ग्राहकास अपुरा वीज पुरवठा होणार नाही. याचा विचार होऊन ग्राहकाची तक्रार निरर्थक असल्याने ती फेटाळण्यात यावी असे श्री. चिटेगी यांनी शेवटी सांगितले.

सुनावणीचेवेळी तक्रारदार व वि.प. यांनी केलेले कथन तसेच उपलब्ध असलेली कागदपत्रे पहातां प्रकरणी खालील प्रमाणे परिस्थिती असल्याचे दिसून येते. अपीलदार श्री. गावडे यांच्या मौजे नांदवडे, ता. चंदगड येथील शेतीपंपास शेवाळे ग्रुपचे रोहित्रावरून विद्युत पुरवठा करण्यात आला आहे. सदरचा विद्युत पुरवठा कमी दाबाचा होत असल्याने स्टार्टर व मोटारी जळणे असे प्रकार वारंवार होवू लागल्यामुळे त्यांनी जादा ५ मोटारधारकांचा ग्रुप करून वि.प.कडे नवीन रोहित्राची मागणी केली होती. त्यास अनुसरून वि.प.ने मंजुरी देवून पोल टाकण्याचे काम सुरू केले. त्यावेळी श्री.धोंडिबा पाटील यांनी हरकत घेवून काम बंद पाडले. परिणामी सर्किट वळवून नवीन पोल उभे करण्यास व लाईन टाकण्यास अनावश्यक विलंब झाला. शेवटी सन २००६ मध्ये काम पूर्ण होवून नवीन रोहित्र कार्यान्वीत करण्यात आले. श्री. पाटील यांनी पोल उभे करण्यास अडथळा केल्याचे कामी कनिष्ठ अभियंता चंदगड यांनी त्याला कसलीही विचारणा केली नाही अगर अनावश्यक हरकत घेतल्या बाबत त्याचेविरूध्द कोणतीही कारवाई केली नाही. मात्र ग्राहकाने मंजूर करून घेतलेल्या नवीन रोहित्रावरून त्यांना तातडीने वीज कनेक्शन दिले आहे. वि.प. यांचे म्हणण्यानुसार जरी या रोहित्रावर लोड शिल्लक असल्याने श्री.पाटील यांना कनेक्शन दिले असले तरी त्यांनी केलेल्या अडथळयामुळे नवीन रोहित्र कार्यान्वीत करण्याचे काम २००६ पर्यंत रेंगाळले. त्या दरम्यान ग्राहकाचा कसलाही दोष नसतांना त्यांच्या शेतीचे नुकसान झाले. या ग्राहकाचे म्हणण्यात तथ्यांश असल्याचे मंचाचे मत आहे. या कामी ग्राहकाने श्री.गुंडकल,कनिष्ठ अभियंता, चंदगड यांना जबाबदार धरले आहे. त्यांचे वरिष्ठांनी या बाबत चौकशी केल्याचे दिसून येत नाही. कक्षाचे आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री.धोंडिबा पाटील यांना शिल्लक लोडमधून वीज पुरवठा करण्यात कांहीही गैर नाही असे गृहीत धरले तरी श्री. धोंडिबा पाटील यांनी पोल टाकण्यास केलेल्या अडथळयाबाबत त्यांचेकडे विचारणा करणे, त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करणे आवश्यक होते अशी मंचाची धारणा आहे. श्री.पाटील यांना वीज कनेक्शन देतांना वि.प. यांचे वतीने कोणीही त्या ठिकाणी उपस्थित नव्हते, तसेच वीज कनेक्शन देण्याचे कामी बरेच मोठे अर्थकारण घडल्याची तक्रारही ग्राहकाने मंचासमोर केली आहे. सदरचे बाबत सविस्तर चौकशी करण्याचे निर्देश मंच देत आहे. नवीन रोहित्रावरून श्री. धोंडिबा पाटील यांचे प्रमाणे वि.प. यांनी मनमानी करून इतरांना मोठ्या प्रमाणांत वीज कनेक्शन दिल्यास प्रस्तुतचे ग्राहकाला पूर्वीप्रमाणे कमी दाबाचा वीज पुरवठा मिळून शेतीचे नुकसान होण्याची भिती वाटते. तसे होणार नाही असे वि.प. यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. त्यावरून सदरचे बाबत ग्राहकाने केलेल्या तक्रारीचे निवारण होण्यास मदत होईल अशी मंचाची धारणा आहे. त्यास अनुसरून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१) अपीलदार यांनी श्री.गजानन गुंडकल, कनिष्ठ अभियंता, चंदगड यांचेविरूध्द केलेल्या गंभीर तक्रारीबाबत वि.प. यांनी सखोल चौकशी करावी व तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा–हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे ८.७ चे तरतुदीनुसार मंचास दिनांक ३१.१२.२००७ पर्यंत कळवावे.

२) प्रस्तुतचा निर्णय अपीलदार यांना मान्य न झाल्यास त्यांना या आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल केशवा बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०० ०५१ यांचेकडे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| ( एस. आर. बांबळे ) | ( जी. सी. लेले) | ( के. व्ही. पाटील ) |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच, कोप, कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच, कोप, कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच, कोप, कोल्हापूर |